
ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

(10) Dr. Kailas Sawant
(History)

VOLUME - I ISSUE - I
April to june 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | The Role of the World Trade Organization in International Trade | Dr. Shankar LaxmanraoSawargaonkar. | 1-3 |
| 2 | CHRONOLOGICAL MILIEU OF THE EMERGENCE OF WHITE COLLAR CRIMES | Dr. Yogarajsingh R Bais | 4-9 |
| 3 | "CLIMATE CHANGE AND IT'S IMPACT ON AGRICULTURAL PRODUCTIVITY IN INDIA : A GEOGRAPHICAL STUDY " | Dr.Ghodke.J.V. | 10-13 |
| 4 | Different dimensions of Indian maritime traditions in Pre-European era | Rashmi S Pawar | 14-18 |
| 5 | Dalit Literature; Realistic Image of Downtrodden | Dr.Sasane S.S. | 19-21 |
| 6 | Need for Empowerment of Micro, Small and Medium Enterprises Sector | Dr. Valmik Dagadu Parhar | 22-26 |
| 7 | Psychological review on sex differences in brain and its cognitive impact in day toady humanbehavior | Mrs. Gauri M. Kulkarni. | 27-29 |
| 8 | Gender Discrimination' in ShashiDeshpande' The Dark Holds No Terrors. | Dr.MrsJayashri Ajay Aphale | 30-33 |
| 9 | Bapsi Sidhwa's The Crow Eaters: A study of Parsi culture, tradition and ethos. | Ashwini Ankush Chavan | 34-37 |
| 10 | Botany : The eldest daughter of medicine | Mrs. Namrata Sunil Mirase | 38-41 |
| 11 | Realistic image of labour class and Dalits in the literature of Annabhau Sathe | Dr.A. B.Galphade | 42-44 |
| 12 | Persistent Silence of Women in Shashi Deshpande's Novels | Dr. Jare M. R.<br>Mr. Sangharsh Gaikwad | 45-47 |
| 13 | Economic view of Environmental Consumption | Dr.Onkar Balkrishna Khiste | 48-50 |
| 14 | Impact of COVID-19 on Indian Agriculture | Dr.Landge Balwant Bhimrao | 51-54 |
| 15 | SCIENTIFIC DEVELOPMENTS DURING THE REIGN OF SULTAN FIRUZ SHAH TUGHLAQ | Dr. Aneesa Iqbal Sabir. | 55-58 |
| 16 | SOCIAL WORK FUNCTIONS IN EARTHQUAKE DISASTERS | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P | 59-62 |
| 17 | Swami Vivekanand : Eternal Source of Energy and Humanism | Dr.Arjun B. Galphade | 63-64 |
| 18 | The Terms: The Subaltern and Dalit | Dr Suresh B Deshmukh | 65-69 |
| 19 | Think World Without Women.... | Sharad Subhashrao Pawar<br>Dr.Swapna C. Vyawahare | 70-72 |
| 20 | The Empowerment of Agriculture in the Country (An Overview of three legislations enactedby theCentral Government.) | Dr. Swati Anil Joshi | 73-78 |
| 21 | दलितांचा सामाजिक संघर्ष | प्रा.डॉ. वैशाली बाबुराव कोटंब | 79-82 |
| 22 | महात्मा फुले यांची शेतीविषयक विचार | अनिता मदनराव शिंदे | 83-86 |
| 23 | नारायण सुर्वे यांच्या कवितेतील स्त्रीरुपे। | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे | 87-93 |
| 24 | मानवतेची शिकवण देणारी ग्रामगीता | प्रा.डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे | 94-96 |
| 25 | बलुतं मधील दलित चळवळीचे दर्शन | प्रा. डॉ. हेमंतकुमार बागडे | 97-99 |
| 26 | बारोमास आणि तहान कादंबऱ्यातील जीवनजाणिवा | श्रीमती आशा शंकरराव पालवे<br>डॉ. अनिल गर्जे | 100-103 |
| 27 | लोकनाट्य आणि नागरनाट्य | डॉ. संगीता खुरद | 104-107 |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | ८५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाध्यक्ष मा.श्री.सुरेश खरे यांच्या अध्यक्षीय भाषण | प्रा. श्री. वाव्हळ नरेंद्र पांडुरंग | १०८-१११ |
| २९ | इतिहासाची शेकात्मिक कथा:जुबा | प्रा.मुतवल्ली मैजोद्दीन | ११२-११७ |
| ३० | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | ११८-१२३ |
| ३१ | उत्तम कांबळे यांच्या पारध्याची गाय या साहित्यकृतीचा संक्षिप्त मागोवा | प्रा. डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे<br>श्री रामदास धोंडिबा टेकाळे | १२४-१२६ |
| ३२ | शेतकरी संघटनेची चळवळ : सामर्थ्य आणि मर्यादा | प्रा.डॉ. गजानन जाधव | १२७-१२९ |
| ३३ | मराठी साहित्यात असलेलेकादंबरी वाङ्मयाचे स्वरुप व महत्व | सारिका संदिपान फरांडे | १३०-१३४ |
| ३४ | दलित आत्मकथेत आलेली शाळेतील अस्पृश्यता | प्रा. डॉ.नामदेव शिनगारे | १३५-१३९ |
| ३५ | सांस्कृतिक मूल्यांची जोपासणा करणारी दीर्घ किवाता :शेणाला गेलेल्या पोरी | प्रा.बाजीराव कृष्णाजी पाटील | १४०-१४८ |
| ३६ | युद्ध नको बुद्ध हवा | डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले | १४९-१५१ |
| ३७ | अनुवादित साहित्य तंत्र आणि स्वरुप | डॉ. विठ्ठल केदारी | १५२-१५५ |
| ३८ | टोपी शुक्ला में चित्रित आधुनिक समस्याएँ | प्रा. कलशेट्टी महादेव काशिनाथ | १५६-१५९ |
| ३९ | आपका बंटी उपन्यास में चित्रित बाल मनोविज्ञान | डॉ. सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | १६०-१६३ |
| ४० | बुद्ध वाणी में पाली | प्रशांत हाबु शिंदे | १६४-१६७ |
| ४१ | भारतीय समाज और दलित जीवन | गायकवाड रंजना शिवाजीराव | १६८-१७३ |
| ४२ | तुलसीदार के काव्य की प्रासंगिकता | डॉ. बोईनवाड एन.एन | १७४-१७७ |
| ४३ | भारतातील सर्वाजनिक सहभागाचे मॉडेल Rural Developent | डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड | १७८-१८२ |
| ४४ | 19 व्या शतकाचा प्रारंभ आणि महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मीक घडामोडी | प्रा.डॉ.जाधवर बी.डी. | १८३-१८५ |
| ४५ | रांजणी गावातील नागशिल्प | डॉ.सावंत के.डी. | १८६-१८८ |
| ४६ | राजर्षी शाहूमहाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य | प्रा.राजाभाऊ चव्हाण | १८९-१९२ |
| ४७ | नविन कृषी कायदे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती | प्रा. डॉ. मुजमुले बी. एस. | १९३-१९७ |
| ४८ | महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितिचा कार्यात्म आढावा : सातारा जिल्हा | सुनिता बनकर | १९८-२०१ |
| ४९ | बी.एड द्वितीय वर्ष आंतरवासिता ऑनलाईन माध्यमातुन उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ. वैशाली शा. कंकाळे | २०२-२०३ |
| ५० | कोंकण आदिवासी जमातीची निसर्ग संस्कृती आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास | प्रकाश महादू गावित | २०४-२०७ |
| ५१ | जयपूर -अत्रोली घराण्याची परंपरा व वास्तवता यांचा अभ्यास | डॉ. विनोद ठाकूर देमाई | २०८-२१३ |


२१२

# रांजणी गावातील नागशिल्प

**डॉ.सावंत के.डी.**
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला महाविद्यालय,गेवराई

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून भारत निसर्गपूजक देश असल्याने सुर्यपुजेचे उल्लेख ऋग्वेदातही आलेली आहेत. सादृष्याधिष्ठीत कल्पनेच्या जोरावर नाग आणि सुर्याच्या अनेक कथा गुंफण्यात आल्या आहेत. नाग हा सुर्याप्रमाणे गायब होतो. सुर्याप्रमाणेच विद्युलता नागाच्या ठाई दिसते. सुर्याची दाहकता व नागाचे विष यांची तुलना, सुर्याचे तेज व नागाच्या लखलखीपणा यातील साम्यस्थळे पाहून नाग आणि सुर्य यांचे एकत्रितकरण पौराणिक कथेतून शिल्पकथेत उतरलेले दिसते. त्यासोबतच नागाचा लिंग सदृष्य आकारही त्यास लैंगिक प्रतिक बहाल करते.

नागपूजेची सुरुवात इजिप्तमध्ये झाली असे मत सी.एफ.ऑल्डहॅम यांनी आपल्या 'The Sun and the serpent a contribution to the History of Serpent worship' या ग्रंथात मांडले आहे तर ग्रॅफिटन एलिएट स्मिथ यांनी Geographical Distribution of the practice of Mummification चा संशोधनपर अभ्यास करताना सुर्यपूजा आणि सर्पपूजा यांचा जन्म इजिप्तमये झाला असल्याचे सूचित केले आहे. जगात जिथे जिथे या पूजा केल्या जातात त्या इजिप्शियन प्रभावातून केल्या जातात असेही ते मानतात.

'The Migration of early culture' या ग्रंथात स्मिथ यांनी मांडलेल्या मतांना विरोध दर्शवत लाथनकॅप यांनी त्यांच्या 'Lost Continents the Atlantis theme in History Science andliterature' या ग्रंथात असे म्हटले आहे की, संस्कृतीचे एकच केंद्र असते व तिथून ती संस्कृती जगात प्रसरण पावते असे समजणे योग्य नाही. वास्तविक संस्कृतीचे विशेष जगात अन्यत्र पसरत असतात. म्हणून इजिप्तच्या लोकांना किंवा अन्य कोणत्याही लोकांना असे ध्येय देणे योग्य होणार नाही असे त्यांना वाटते.[१]

जगातील सर्वच प्राथमिक धर्मामध्ये व आदिम समाजांमध्ये नागपूजा प्रचलित असल्याचे आढळते. भारतात सर्वत्र नागपूजा प्रचलित आहे. वेदपूर्व काळापासून भारतात नागपूजा प्रचारात असावी. मोहेंजोदडो येथील उत्खननातही

नागमूर्ती आढळल्या आहेत.नाग विषारी असल्यामुळे मनुष्याला त्याची फार भीती वाटते. नागांना संतुष्ट करण्यासाठी सर्पबळी, नागबळी इ.विधी गृहसुत्रामध्ये सांगितले आहेत. अशाप्रकारे नागांपासून आपले संरक्षण व्हावे या उद्देशाने प्राचीन काळापासून नागपूजा भारतात प्रचारात आली आहे.[२] मराठीत नागशिला म्हणून संबोधन केल्या जाणाऱ्या या शिळा सारा भारत नागपूजक होता हे सिध्द करतात.

महाराष्ट्रातील काही वंशाची नावे अशेषफ अशी आहेत. प्रख्यात शिंदे घराणे हे ही नागपूजकच होते. कर्नाटक, महाराष्ट्रात अनेक शिंदे घराणी आहेत. राष्ट्रकूट नृपती गोविंद तृतीय यांच्या नेसरी ताम्रपटात त्याचा सामंत नागहस्ती याचा उल्लेख येतो. कर्नाटक राज्यातील चंद्रवल्ली, बागलकोट, भैरणमट्टी, हरिहर, मात्र हल्ली येथील शिलालेखात नागवंशी राजांचे अनेक उल्लेख येतात. पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथेही नागवंशीय शिंदे याची एक शाखा राज्य करीत होती.[३] पैठणचे सातवाहन हे नागवंशीय राजे होते. महाराणी नागनिका ही नागकन्याच. तसेच श्रावण शुध्द ५ ला महाराष्ट्रात नागपंचमी सण नागपूजा म्हणून साजरा केला जातो. यांचा अर्थ असा की महाराष्ट्रात बहुतांश लोक नागपूजक असल्याचे दिसतात.

ब्राम्हण, जैन तसेच बौद्ध या धर्मात नागाला महत्त्वाचे स्थान आहे. नाग हे सर्पपूजक मानव असावेत. असे फर्ग्यूसन आणि होल्डहॅम यांचे मत आहे. सर्प हे नागांचे वंशचिन्ह असावे.[४] नागपूजा किंवा सर्पपूजा हा पंथ वैदिक काळात अस्तित्वात होता. गृहसूत्रात श्रवण किंवा श्रवणकर्म हा विधी यास 'सर्पबली' हे नाव

आढळते.[५] नागाच्या सर्वच गोष्टी अद्‌भूत असतात. सापाच्या देहात देवाचे किंवा भूताचे वास्तव आहे किंवा तो स्वयंभेद देव आहे. किंवा तो एखाद्या देवाचे प्रतिक आहे.[६] अशा समजूतीने मानव कुलांनी सर्प हे दैवत बनवले. सर्प हा वारुळात राहतो आणि वारुळ हे या देवतेचे प्रतिक मानले आहे.[७]

प्राचीन काळापासून मानवाने नागपूजा करण्यासाठी गावागावात नागशिल्पे शिळावर कोरलेली दिसतात. तसेच बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अनेक गावात नागशिल्पे शिळेवर कोरलेली दिसतात. त्यापैकीच गेवराई शहरापासून दक्षिणेला ९ कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्ग ५२ च्या पुर्वेला राष्ट्र कुटकालीन रांजणी गाव वसलेले आहे. या गावाला प्राचीन,मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या गावात अनेक ऐतिहासिक शिल्पे दिसतात. त्यामध्ये बारव स्थापत्य, मंदिर स्थापत्य व तेराव्या शतकातील सुफि संताचे घोडमसावली दर्गा, वीरगळ, सती शिळा वीरगळ तसेच महादेवाच्या मंदिरामध्ये नागशिल्प दिसते. अशा या नागशिल्पाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो समाजासमोर, इतिहासाच्या अभ्यासकासमोर यावा हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) रांजणी या गावचे ऐतिहासिक प्राचीन व मध्ययुगीनत्व जाणून घेणे.

२) रांजणी येथील नागशिल्पाचा अभ्यास करणे.

३) नागशिल्पाच्या माध्यमातून रांजणी गावातील शिल्प संस्कृती समजण्याचा प्रयत्न करणे.

**गृहितके :**

१) रांजणी गावाला प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास लाभलेला आहे.

२) नागशिल्पाच्या माध्यमातून रांजणी गावातील शिल्प संस्कृतीची ओळख झाली.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक, संदर्भ, सर्वेक्षण आदी संशोधन पध्दतीचा आधार घेतला आहे व प्राथमिक व दुय्यम साधने वापरली आहेत.

**रांजणी गावातील नागशिल्प :**

हे नागशिल्प महादेव मंदिराच्या सभामंडपात गर्भगृहाच्या आतील भागात डाव्या बाजूला गर्भगृहाच्या भिंतीला चिकटून आहे. मंदिरातील नागशिल्प सपाट शिळेवर कोरलेले आहे. या शिळेवर कोरला गेलेला नाग हा वेटोळयांनी युक्त दिसतो. तसेच या नागाचे मुख वरच्या दिशेला असून डोक्यावर फणे आहेत. स्थानिक लोकांनी मूर्तीची पूजा करताना मूर्तीला शेंदूर तसेच हळदी-कुंकू, भस्म लावले आहे. त्यामुळे मूर्ती जीर्ण होवून मूर्तीच्या पश्चिमेकडचा भाग तुटला आहे. तरीही या नागाचा आकार मोठा असल्याचे स्पष्ट दिसते. या नागशिल्पाची उंची ६० से.मी. व रुंदी ३० से.मी. आहे.



**रांजणी गावातील नागशिल्प**

## समारोप व निष्कर्ष :

१) प्राचीन काळापासून भारतात नागपूजेचे अस्तीत्व दिसून येते. नाग हा प्राणी आहे. त्याप्रमाणे नागवंशीय लोकही आहेत. आधुनिक काळातही नागपूजेचे अस्तित्व समाजात दिसून येते. रांजणी गावातही नागपूजेची परंपरा असल्याचे प्रस्तुत नाग शिळेवरुन दिसून येते.

२) रांजणी गावात विखुरलले शिल्पावशेष आणि अनेक पूर्व मध्ययुगीन व मध्ययुगीन मंदिर अवशेष यावरुन

रांजणी गावचे राजकीय, सांस्कृतिक महत्त्व प्राचीन, मध्ययुगीन काळात असावे असे लक्षात येते.

३) रांजणी गावातील नागशिलेबाबत आजवर कोणीही संशोधन केले नाही. त्या अनुषंगाने या नागशिळेच्या कालखंडाबाबत पुढील अभ्यास राहणार आहे. तरीही या शोधनिबंधाच्या माध्यमातन नागशिल्पाचे सद्यःकाळातील स्थान, त्यांचे वैशिष्ट्ये, मोजमापे, नागपूजेचे संदर्भ आणि रांजणी गावचा सांस्कृतिक, राजकीय इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या संशोधनातून काही निष्कर्ष समोर आहेत ते पुढीलप्रमाणे -

रांजणी गावातील नागशिळेकउे केवळ पूजा विधी किंवा नागदेवता म्हणून मर्यादित उद्देशाने पाहिले जाते. या नागशिळेचे शिल्प म्हणून अनन्य साधारण महत्त्व आहे हे गावकऱ्यांना पटवणे आवश्यक आहे.

## संदर्भ सूची :


१) डॉ.सुर्यवंशी नानासाहेब, (संपा), अक्षरवाङ्.मय, डॉ.प्रभूणे अरुण, त्रेमासिक,वर्ष-पहिले, अंक-पहिला, जून ते ऑगस्ट, २०१०, पृष्ठ ५,६

२) जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपा), मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई, १९७९, पृष्ठ ४१०

३) सागर औरंगाबादी, नागमंडल, झुम, दै.लोकमत, दि.११ ऑगस्ट १९९४, पृष्ठ १३

४) जोशी नि.पु.,भारतीय मूर्तीशास्त्र, नागपूर, १९७९, पृष्ठ ३१६

५) जटसा हरिराम, भारत में नागपूजा और परंपरा, सन्मार्ग प्रकाशन दिल्ली, पृष्ठ ३३ ते ३६

६) डांगे सदाशिव, वारुळ प्राचीन संकेत, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक-१९८८, पृष्ठ १ ते ७

७) पाटील माया, मंदिर शिल्पे, मुंबई-२०१४, पृष्ठ १२३ ते १२४